● मंगळवार, दि. ४ फेब्रुवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १८७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

जिल्हाधिकाऱ्यांच्या हमीनंतर शेतकऱ्यांचे आंदोलन १५ मार्चपर्यंत स्थगित; आ. खोतकरांची शिष्टाई फळाला

# ...नसता राज्य दखल घेईल असे आंदोलन उभा करु - दिलीप राठी

## जिल्हाधिकारी साहेब आता भेदभाव करु नका...

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विविध समस्यांसाठी आंदोलने करण्यात येतात. उपोषणासाठीही बसल्या जाते. या आंदोलन-उपोषणस्थळी जिल्हाधिकारी हे त्यांच्या प्रतिनिधींना पाठविण्याचा नेहेमीचा अनुभव आहे. अथवा आंदोलनातील दोन-पाच जणांचे शिष्टमंडळ जिल्हाधिकारी यांच्या दालनात जावून निवेदन देत चर्चा करतो असा आजपर्यंतचा इतिहास आहे. आता देवमुर्ती परिसरात उपोषणास बसलेल्या शेतकऱ्यांचे उपोषण सोडवण्यासाठी खुद्द जिल्हाधिकारी यांनी उपोषण स्थळी भेट दिली. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी नवा पायंडा घालून दिला आहे. जिल्ह्यात कोणत्याही ठिकाणी आंदोलन- उपोषण झाल्यास आणि त्या आंदोलन उपोषणकर्त्यांनी जिल्हाधिकारी यांच्या आश्वासनाशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याचा पावित्रा घेतल्यास यापुढे जिल्हाधिकारी यांना स्वतः आंदोलन उपोषणस्थळी जावे लागेल. यापुढे आंदोलनकर्त्यांमध्ये जिल्हाधिकारी यांना भेदभाव करता येणार नाही हे महत्त्वाचे.

**जालना । प्रतिनिधी** - गत ७ दिवसांपासून नांदेड-जालना समृध्दी महामार्गासाठी संपादीत होणाऱ्या जमिनीच्या मुल्यांकनासह विविध मागण्यांसाठी देवमुर्ती येथे सुरु असलेले शेतकऱ्यांचे धरणे आंदोलन अखेर सोमवार (दि. ३) रोजी सायंकाळी उशीरा स्थागित करीत असल्याची घोषणा प्रमुख दिलीप राठी यांनी केली आहे. त्यासाठी महत्वाची भुमिका आ. अर्जुनराव खोतकर यांनी बजावली असून, त्यांनी शेतकरी व प्रशासन यांच्यात चर्चा घडवून आणीत जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांना प्रत्यक्ष आंदोलनस्थळी नेवून त्यांच्याकडून मुल्यांकनासह इतर विषयाबाबत सकारात्मक प्रयत्न




करण्याचा शब्द घेतला. त्यामुळे आंदोलन स्थगित होण्याला यश मिळाले आहे.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की, नांदेड समृध्दी महामार्गात शासन संपादीत करीत असलेल्या जमिनींचे अत्यल्प मुल्यांकन निश्चित करण्यात आलेले आहे. त्यासोबतच अनेक शेतकऱ्यांच्या शेतात विहीरी, शेततळे,

पान २ वर

आ. अर्जुनराव खोतकर यांनाही शेतकरी आंदोलनाची दखल घेऊन एकदा-दोनदा नव्हे तर तिसऱ्यांदा उपोषण स्थळी भेट देत शेतकऱ्यांना प्रामुख्याने शेतकरी दिलीप राठी यांना समजावण्याचा प्रयत्न केला. उपोषणकर्ते व प्रशासन यांच्यात सफलतापुर्वक मध्यस्थी करण्याचे कार्य आ. खोतकर यांनी केले. लोकप्रतिनिधी म्हणून जालना विधानसभेची संपूर्ण जवाबदारी ही आ. खोतकर यांच्यावर आहे. त्यामुळे त्यांनी अशाच पद्धतीने मतदार संघातील दीन-दलित, सर्वसामान्यांच्या उपोषणाच्या वेळीही तत्परता दाखवावी आणि पिडीतांच्या समस्या शासन-प्रशासन दरबारी पोटतिडकीने मांडाव्यात...

## कमी राशन देणाऱ्या दुकानदाराची तक्रार करण्याचे आवाहन



**जालना । प्रतिनिधी** - रेशन दुकानदारांना रेशन माल कमी जात नाही असे स्पष्टीकरण जालना जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी दिले आहे. रेशन दुकानदारांना रेशन माल जागेवर मोजून दिला जातो असे प्रकाश जाधव म्हणाले. गोदामातून सगळा रेशन माल घेऊन गाड्या थेट रेशन दुकानात जातात, त्याठिकाणी रेशन दुकानदारांना वजन करून माल दिला जातो असेही जाधव यांनी म्हटले आहे. जर रेशन दुकानदार कमी रेशन

पान २ वर

युवा आदर्श

## कळो हद्द ...

रिल्स बनवा अद्भुत
क्षणात व्हा प्रसिद्ध
रसिकांना जिंकाया
सदैव रहायचे सिध्द
अतिरेक सहज करी
आडवे आपली जिद्द
कळत नाही स्वतांस
कधी ओलांडली हद्द
सोशल मीडिया तीव्र
का हरवला हेतू शुद्ध
चुकीच्या मार्गे वळले
बनलो केंव्हा निर्बुद्ध
अंकुश नाही कसला
अति मोकळे अबध्द
भिती नुरली कसली
धाडस करी असंबद्ध
स्वता लावल्या आगी
स्वतांचे झालोयं दग्ध
रिल्स शिवाय सुचेना
किती होतो मंत्र मुग्ध
रिल्स काही असे भले
रेअपुरे स्तुतीला शब्द
सांगून जाई खूप काही
प्रभाव साधते निशब्द

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

" उच्चतम वर्ग "

कृषी उत्पन्न बाजार समिती, जालना

श्री छत्रपती शिवाजी महाराज बाजार संकुल, भोकरदन-देऊळगाव राजा रिंगरोड, नविन मोंढा, जालना
उपबाजार पेठ : रामनगर, नेर, सेवली
ऑफिस : (02482) 229107, 229655, Email : am_jalna@msamb.com

महाराष्ट्रातील अग्रगण्य बाजार पेठेची काही ठळक वैशिष्ट्ये

- गरजवंत शेतकऱ्यांच्या मुलां करिता शहरामध्ये शिक्षण घेता यावे म्हणून बाजार आवारामध्ये मोफत वस्तीगृहाची सुरुवात
- बाजार आवारामध्ये शेतकरी व इतर बाजार घटकां करिता नाममात्र दरामध्ये RO फिल्टरचे पिण्याचे पाणी.
- बाजार संकुलात भुसार, गुळ, फळे व भाजीपाला, मोसंबी तसेच होलसेल किराणा, सिडस् मार्केट व शेतीपुरक सर्व व्यवसाय एकाच बाजार आवारामध्ये एकत्रितपणे सुरु.
- शेतकऱ्यांनी शेतमाल विक्रि केल्यानंतर 24 तासांच्या आत पेमेंट शेतकऱ्याना अदा करण्यात येते
- सर्व शेतमालाचे वजन इलेक्ट्रॉनिक वजनकाटयाव्दारेच.
- उपबाजार पेठ सेवली येथे दैनंदिन बाजार पेठ सुरु करुन शेतकऱ्यांच्या वाहन खर्चामध्ये बचत.
- रेशीम उत्पादक शेतकऱ्यांसाठी रेशीम कोष मार्केटची यशस्वी सुरुवात.
- शेतमाल तारण कर्ज योजने व्दारे शेतकऱ्यांना दिलासा.
- 24 तास 60मे.टनी इलेक्ट्रॉनिक्स भुईकाट्याची व्यवस्था.

शेतकऱ्यांसाठी आवाहन

- शेतकऱ्यांनी आपला शेतीमाल बाजार आवारामध्ये विक्रि करिता आणतांना ओलावा/काडी कचरा विरहीत आणावा ज्यामुळे आपल्या शेतमालास योग्य व जास्तीचा बाजार भाव मिळेल.
- शेतकऱ्यांनी आपला शेतीमाला बाजार समितीच्या बाजार आवारामध्येच विक्रिसाठी आणावा व खाजगी व्यापाऱ्यांकडुन आपली होणारी फसवणुक टाळावी.
- शेतकऱ्यांनी शेतीमाल विक्री केल्यानंतर आपली शेतकरी पट्टी तपासुण पाहावी नियमाविरुध्द इतर कोणतीही कपात झाल्याचे निदर्शनास आल्यास बाजार समितीशी संपर्क साधावा.



मा.श्री.भास्करराव मुकुंदराव दानवे
उपमुख्य प्रशासक



मोहन कन्हीराम राठोड
सचिव



मा.आ.श्री.अर्जुनराव पंडीतराव खोतकर
मुख्य प्रशासक

प्रशासकिय मंडळ, सर्वश्री. मा.आ.अरविंद बाजीराव चव्हाण, राहुल गोवर्धन गवारे, कालिंदा कैलास ढगे, तुकाराम कमळाजी खर्जुले, नरसिंग गणेशराव गोरे,संदिप विठ्ठलराव वाघ, भगवान रामदास अंभोरे, अ.रशिद पहेलवान, ज्ञानेश्वर उत्तमराव शेजुळ, सहदेव बाबासाहेब मोरे, आलमखान मुनीरखान पठाण, संतोष उत्तमराव मोहिते, राजेश रामभाऊ राऊत, विष्णु माणिकराव पाचफुले,

# संपादकीय

## फेसबुकचा वाढदिवस!

विज्ञानामुळे जग जवळ आले आहे असे लहानपणी ऐकले होते ; पण याची खरी प्रचिती फेसबूक या सोशल नेटवर्किंग साईटमुळेच आली. फेसबुक या सोशल नेटवर्किंग साईटला आज म्हणजे ४ फेब्रुवारी रोजी २१ वर्ष पूर्ण झाली . याचाच अर्थ आज फेसबुकचा एकविसावा वाढदिवस आहे. आज जगभरात फेसबुक वापरणाऱ्यांची संख्या दोनशे कोटीहून अधिक आहे. अमेरिकेत माहिती गोळा करणाऱ्या पुस्तकाला फेसबुक असे म्हंटले जाते. अमेरिकेत जेंव्हा डिजिटल युगाची सुरुवात झाली तेंव्हा ही माहिती डिजिटल स्वरूपात आणण्याचे आव्हान मार्क झुकरबर्ग या तरुण मुलाने स्वीकारले. हार्वर्ड विद्यापीठात शिकत असलेल्या मार्कने डस्टिन मॉस्कोविट्स, अँड्र्यूआर्डो सर्विन आणि ख्रिस ह्युजेस या आपल्या मित्रांच्या सोबतीने फेसबुकची स्थापना केली. ४ फेब्रुवारी २००४ रोजी मार्कने हार्वर्ड विद्यापीठाच्या वसतिगृहात फेसबुक सुरू केले. अल्पावधीतच या सोशल नेटवर्किंग साईटने तरुणांना अक्षरशः वेड लावले. फेसबुक आज जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेटवर्किंग साईट बनली आहे. २१ वर्षापूर्वी मार्कने जे रोपटे लावले त्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. जगातील जवळपास बारा देशात फेसबुकची कार्यालये आहेत. फेसबुकची आज पाच हजार कोटींची उलाढाल आहे. फेसबुकला मिळणाऱ्या जाहिरातींमुळे फेसबुकला विनामूल्य सेवा देणे शक्य झाले आहे. १८ मे २०१२ ला फेसबुकने आपले शेअर विकायला काढले या शेअर्सने बाजारात धुमाकूळ घातला. या शेअर्समुळे फेसबुकला कोट्यवधी रुपयांचा फायदा झाला. आज फेसबुकने व्हॉट्सप आणि इंस्टाग्राम या नेटवर्किंग साईटसना देखील आपल्या कवेत घेतले आहे. फेसबुकची वाढती लोकप्रियता पाहून गुगलने फेसबुक विकत घेण्याचा प्रस्ताव मार्क झुकरबर्ग समोर ठेवला मात्र त्याने तो फेटाळून लावला. इंटरनेट विश्वात गुगल नंतर सर्वात जास्त विजिट होणारी वेबसाईट फेसबुक हीच आहे. आजच्या युगात फेसबुक हा तरुणांच्या गळ्यातील ताईत बनला आहे. फेसबुक निर्मितीचे एकमेकांशी संवाद साधने, मतप्रदर्शन आणि देवाणघेवाण हे मुख्य उद्देश होते व आजही कायम आहेत. यासोबतच नवनवीन फीचर्स फेसबुक वापरकर्त्यांसाठी आणते. फेसबुक आज अनेकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. फेसबुकवर एका वापर कर्त्याचे सरासरी पाचशे मित्र आहेत तो दररोज दहा लोकांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवतो किंवा स्वीकारतो फेसबुकवर आज इतके युजर्स आहेत की त्या सर्वांचे एक कुटुंब करायचे म्हटलं तर त्या कुटुंबाची लोकसंख्या जगातील कोणत्याही देशातील लोकसंख्येपेक्षा अधिक असेल. हे विश्वची माझे घर.... या उक्तीप्रमाणे संपूर्ण विश्वाला एक कुटुंब बनवण्याचे काम फेसबुकने केले आहे. फेसबुकला २१ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# मध्यम वर्गीयांना दिलासा याचे स्वागतच,परंतु अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या ईपीएस-९५ पेन्शन धारकांच्या पदरी निराशा?

गेल्या ११ वर्षांपासून ईपीएस पेंशन धारक मिनिमम (कमीत कमी) पेंशनची मागणी करीत आहे.या उद्देशाने कमीत कमी जगण्याइतकी तरी पेन्शन जाहीर करावी अशी पेंशनधारकांची केंद्र सरकारकडे अनेक वर्षांपासून मागणी करीत आहे.यावर लोकसभेत व राज्यसभेत अनेक खासदारांनी प्रश्न सुध्दा उपस्थित केले. सोबतच देशातील अनेक संघटनांनी मंत्री , खासदार,आमदार यांना निवेदनाच्या माध्यमातून सरकारपर्यत आपले प्रश्न मांडण्याचे काम केले. त्यामुळे या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सरकारच्या माध्यमातून ईपीएस-९५ बद्दल ठोस निर्णय घेऊन पेंशन धारकांना दिलासा देईल अशी आशा देशातील दिड करोड वृध्द पेंशन धारकांना वाटत होती.परंतु याही अर्थसंकल्पीय अधिवेशनात ईपीएस-९५ पेंशन धारकांच्या पदरी निराशाच आली ही अत्यंत दुःखद आणि चिंताजनक बाब आहे.अनेक वर्षांपासून पेंशन धारकांचा संघर्ष सुरू आहे.लोकसभा निवडणुकीच्या आधी ईपीएस पेंशन धारकांबद्दल सरकारकडुन चांगली बातमी येण्याचे संकेत होते.परंतु सरकारने पेंशन धारकांच्या पदरी फक्त निराशा दिली.याचे दुःख करोडो वयोवृद्ध पेंशन धारकांना झाले.तरीही जगण्याइतकी पेंशन दिली पाहिजे याबद्दल अजून पर्यंत सरकारला जाग आलेला नाही.ईपीएस-९५ पेंशनचा मुद्दा कोणत्याही एका पक्षाचा,संघटनेचा किंवा संस्थेचा नसुन सार्वजनिक आहे. ईपीएस-९५ पेंशन धारकांना न्याय मिळेल या आशेने आतापर्यंत उम्मीद टीकुन होती.परंतु सरकार मिनिमम पेंशन बद्दल एकही शब्द बोलायला तयार नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे. ईपीएस-९५ पेन्शन बद्दल सरकार सोबत,मंत्र्यांसोबत व अनेक खासदारांसोबत चर्चा होवून सुध्दा सरकार पेन्शन धारकांवर अन्याय करतांना दिसते याचे जिवंत उदाहरण या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिसून आले.आज देशातील दिड करोड ईपीएस-९५ पेन्शन धारकांना कमीत कमी १००० व जास्तीत जास्त ३००० रूपयापर्यंत पेन्शन मिळत असल्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह होणे अत्यंत कठीण झाले आहे.या अल्पशा पेन्शनमध्ये पेन्शन धारक जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही.कारण खाण्यापिण्याचा खर्च, इलेक्ट्रीक बिल, पाण्याचे बिल,घरटॅक्स,वाढती महागाई, वयानुसार औषधोपचार इत्यादी अती आवश्यक सेवा १००० किंवा ३००० रूपयात कशाकाय पुर्ण होणार? हे गांभीर्य सरकारला का दिसत नाही?पेंशन धारकांची मागणी होती की, कमीत कमी ७ हजार ५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता व वैद्यकीय सुविधा मिळावी. परंतु वित्त मंत्री निर्मला सिताराम यांनी संपूर्ण ईपीएस-९५ पेंशन धारकांना निराश केल्याचे स्पष्ट दिसून येते. ईपीएस पेन्शन धारकांचा मुद्दा अत्यंत गंभीर, महत्त्वाचा आणि ज्वलंत असल्याचे मी समजतो. हा ज्वलंत मुद्दा असल्याने याची दखल केंद्र सरकारने या अर्थसंकल्पीय अधिवेशनात घेणे गरजेचे होते.परंतु सरकारने याला यत्किंचितही महत्व दिले नाही ही अत्यंत दुःखद बाब आहे. वृद्धांच्या अडीअडचणी पाहून ईपीएस-१९९५ पेन्शन धारकांचा प्रश्न मार्गी लावायला पाहिजे होता परंतु सरकारने पेंशन धारकांना निराश केले. केंद्र सरकारने आतापर्यंत दिड करोड ईपीएस पेन्शन धारकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले. तरीही ६० ते ८०वर्षाच्या म्हाताऱ्या पेन्शन धारकांनी आतापर्यंत शांततेने आंदोलन केले आणि करीत आहे व जगण्याइतकी पेंशनच्या मागणीची आस लावून बसले होते. कारण पेन्शन ही त्यांच्या म्हारपणाची शीदोरी आहे. त्यामुळे पेन्शन हे जीवन-मरणाचे साधन सुध्दा आहे.याबाबदची सुध्दा सरकारने जान ठेवली नाही. सरकारने पेन्शन धारकांचा अंत न पाहता कोणत्याही योजनेअंतर्गत कमीत कमी ७५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता आणि वैद्यकीय सुविधा ताबडतोब लागु करण्याचा निर्णय आतातरी घ्यावा.आता पेन्शन धारकांच्या प्रश्नावर अंतिम निर्णय घेण्याची वेळ आली आहे.देशात अनेक कठीण प्रश्न आहेत यात दुमत नाही आणि सरकार यावर नेहमी तोडगा काढण्याचा प्रयत्न करीत असते.परंतु आज १४० कोटी जनता व राजकीय पुढारी उघडल्या डोळ्यांनी दिड कोटी पेन्शन धारकांच्या वेदना पाहात आहे व दिसत आहे. परंतु सरकार ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या बाबतीत चेहऱ्यावर पांघरूण घेऊन बसले आहे.सरकारच्या तिजोरीत कामगारांच्या घामाचा अरबो रूपया सरकारजवळ आहे हा पैसा सरकार लोकप्रतिनिधीच्या पगारासाठी,पेन्शनसाठी व इतरत्र वापरत असतो. परंतु सरकार कामगारांना पेन्शन देवतांना भिक दील्यासारखी पेंशन देत आहे. ही लोकशाहीला काळीमा फासणारी व घृणास्पद बाब आहे.याचे दुःख आपल्या पुर्वजांना सुध्दा होत असावे.राजकीय पुढाऱ्यांचे वाढीव पगार,इतर भत्ते व पेन्शन सुरळीत सुरू असतात व सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार वाढले की त्यांचेही पगार व पेंशन वाढतात याला काय म्हणावे?पेंशन धारकांच्या या घटनेवरून असे दिसुन येते की सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले की काय असे वाटत आहे. केंद्र सरकार पेन्शन धारकांना वाचवीण्यापेक्षा वाऱ्यावर सोडल्याचे काम करीत आहे. परंतु आताही वेळ गेलेली नाही देर आज दुरूस्त आए ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या मागणीवर सरकारने गांभीर्याने विचार करून अवश्य अंतीम निर्णय घेवून पेन्शन धारकांना दीलासा देवुन त्यांचा मार्ग मोकळा करावा. कारण ईपीएस-९५ पेन्शन धारक प्रत्येक अधिवेशनात पेन्शन वाढण्याची वाट पाहत असतो.परंतु नेहमी त्यांच्या नशिबी नीराशा लागते. ईपीएस पेन्शन धारकांनी गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत अनेक आंदोलने करून रस्त्यावर उतरले. तरीही सरकारचे डोळे उघडले नाही. म्हणजेच केंद्र सरकार ईपीएस-१९९५ पेन्शन धारकांबद्दल उदासीन असल्याचे दिसून येते. अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्थमंत्री निर्मला सीतारामन ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या जखमेवर फुंकर घालेल असे वाटत होते.परंतु सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले व निराशा हाती आली.ईपीएफओचा पैसा हा राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्रात जात असतो. त्यामुळे ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांना न्याय देण्याचे काम व दायीत्व केंद्र सरकारचे असते तेवढेच राज्य सरकारचे सुध्दा असते.कारण देशाच्या विकासाकरिता संपूर्ण पैसा हा राज्य सरकारच्या तिजोरीतुन केंद्रात जात असतो.त्यामुळे कामगार व कर्मचाऱ्यांचा ईपीएफओने घेतलेला पैसा गेला कुठे? असाही प्रश्न दिड करोड पेन्शन धारकांपुढे उपस्थित आहे.त्यामुळे प्रत्येक राज्यातील कामगार व कर्मचारी विचारत आहे की पेन्शन करीता कापलेला पैसा गेला कुठे? ईपीएस १९९५ चे पेन्शन धारक आपल्या हक्काचा पैसा पेन्शनच्या स्वरूपात सरकारला मागत आहे.परंतु सरकार यावर मात्र मौन धारण केल्याचे दिसून येते. म्हणजेच आज पेन्शन धारकांची परीस्थिती अशी झाली आहे की आपलाच पैसा आपणच चोर. त्यामुळे ईपीएस १९९५ च्या पेन्शन धारकांसमोर प्रश्न आहे की जगावे की मरावेअशी गंभीर परिस्थिती आज ईपीएस पेन्शन धारकांची झाली आहे. त्यामुळे सरकारने ईपीएस पेन्शन धारकांना कमीत कमी ७५०० रूपये पेन्शन, महागाई भत्ता व इतर सुविधा लागू करून पेन्शन धारकांना योग्य न्याय सरकारने द्यावा. पेंशनधारक आशावादी आहेत.त्यामुळे पेन्शन धारकांना विश्वास आहे की ईपीएस १९९५ पेन्शन धारकांचा प्रश्न अवश्य सुटेल. पेंशन धारकांची ही लढाई अंतिम आहे. ईपीएस पेन्शन धारक चिंतेने मरत आहे, महागाई वाढत आहे, आर्थिक परिस्थिती नाजूक होत आहे. सुप्रिम कोर्टाचेही म्हणने आहे की ईपीएस पेन्शन धारकांना मीळणारी पेन्शन ही तुटपुंजी आहे.त्यामुळे जगण्याइतकी पेन्शन मिळायलाच पाहिजे. शेतकरी हा ज्याप्रमाने देशाचा अन्नदाता आहे त्याचप्रमाणे देशाचा कामगार हा शिल्पकार आहे याची जाण केंद्र सरकारने ठेवली पाहिजे.राजकीय पुढारी मोठ्या ऐटीने सांगतात की समान हक्क,समान न्याय, समान अधिकार मग ईपीएस पेन्शन धारकांच्या पेन्शनमध्ये व राजकीय पुढाऱ्यांच्या पेन्शन, पगार यात तफावत का? असाही प्रश्न सर्वसामान्यांसमोर उपस्थित होतो.केंद्र सरकारने ज्याप्रमाणे आठव्या वेतन आयोग स्थापनेला मंजुरी दिली.त्याचप्रमाणे ईपीएस-९५ पेंशन बद्दल सरकारने ठोस निर्णय घेतला पाहिजे.मी केंद्र सरकारला विनंती करतो की आपण अनेक योजना अंमलात आणल्यात त्याचे मनापासून स्वागत.परंतु २०१४ पासून प्रलंबित असलेला व लोकसभेत पक्ष-विपक्षाच्या अनेकदा खासदारांनी उचललेला ईपीएस-९५ चा पेंशनचा मुद्दाला गांभीर्याने घेऊन कमीत कमी ७५०० रूपये पेंशन जाहीर करून अवश्य मार्गी लावेल अशी आशा देशाच्या दिड करोड पेंशन धारकांना आहे.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर**
**मो.नं.९९२१६९०७७९.**

# धारावीत वधू-वर परिचय मेळाव्यास उदंड प्रतिसाद

**मुंबई -** कक्कय्या समाज सार्वजनिक गणेशोत्सव धारावी यांच्या वतीने सायन येथील डि. एस हायस्कूल मध्ये वधू -वर परिचय मेळावा आयोजित केला होता. सन्मा. गुरुमाता नंदाताई (साध्वी )यांच्या उपस्थित हा वधू -वर परिचय मेळावा उदंड प्रतिसादात संपन्न झाला. यावेळी समाज बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

वधू -वरांना एकाच व्यासपीठावर आणून त्याच्या अपेक्षा काय आहेत याची माहिती मिळते.शिवाय लग्न जुळवतना वधू आणि वरांच्या घरच्या मंडळींना वधू वरांच्या अपेक्षा काय आहेत याची माहिती अगोदरच कळल्यामुळे कुठलीच अडचण निर्माण होत नाही.

भावी वधूवर निवडतांना जास्त अपेक्षा करणे व्यर्थ. त्यापेक्षा माणसं कशी आहेत, हेच पाहणे महत्त्वाचे. वाढत्या कौटुंबिक गरजा, त्या पूर्ण करण्याच्या अनुषंगाने ताणतणाव कौटुंबिक दुराव्यामुळे वधूवर पालक परिचय मेळावा ठिकठिकाणी आयोजित होणे आता आवश्यक बाब बनली आहे. त्यामुळे कक्कय्या समाज सार्वजनिक गणेशोत्सव धारावी यांनी पुढाकार घेऊन संत कक्कय्या समाजाचा वधू-वर परिचय मेळावा यशस्वीरित्या पार पाडला. यावेळी २००हून अधिक नवोदित वधू वरांनी आपली नाव नोंदणी करुन आपला परिचय दिला.

कक्कय्या समाज सार्वजनिक गणेशोत्सव धारावी यांनी आयोजित केलेल्या या वधू वर परिचय मेळाव्यासाठी कार्याध्यक्ष मनोहर सोनवणे, अध्यक्ष हेमंत व्हटकर, सचिव मसाजी होटकर, खजिनदार मंगेश खरटमल, उपाध्यक्ष परशुराम खंदारे, उपाध्यक्ष किरण व्हटकर, उपसचिव बाबुराव कावळे, उपखजिनदार रविंद्र कदम, वित्तीय सल्लागार सुनिल पोळ,मुख्य कार्य सल्लागार विजय शिंदे, सल्लागार उत्तम शिंदे, सल्लागार मछिंद्र कदम, सल्लागार विजय पोळ, व्यवस्थापक विश्नाथ शिंदे, व्यवस्थापक अविनाश चौगुले, अं. हि. तपासणीस योगराज कटकधोंड तसेच मंडळाचे सदस्य गौतम व्हटकर, विकास व्हटकर, दिपक खंदारे, गिरीराज शेरखाने,जयसिंग,किशोर खाटीकमारे गंगा जोगधनकर, माधुरी गायकवाड इत्यादी सभासदांनी विशेष मेहनत घेऊन वधू वर परिचय मेळावा पार पाडला. यावेळी समाजातील विविध मान्यवर मंडळींनी उपस्थित राहून कक्कय्या समाज सार्वजनिक गणेशोत्सव धारावी यांच्या कार्याचा गौरव केला.



# ‘बांगलादेशी घुसखोर शोध मोहिम’ राबवा

## घुसखोरांना साहाय्य करणाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा!; - हिंदु जनजागृती समितीची मागणी



**मुंबई -** देशभरात अनेक राज्यांत बांगलादेशी घुसखोरांचा अक्षरशः सुळसुळाट झाला आहे. यातून राज्याच्या सुरक्षेला मोठा गंभीर धोका निर्माण झाला असून सामाजिक अस्थिरता, गुन्हेगारी वाढ, रोजगाराची समस्या, तसेच खोट्या कागदपत्रांवर वास्तव्य करणार्यांचे मोठे रॅकेट राज्यात सक्रिय असल्याचे दिसून येते. या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगाल, ‘आसाम’सारखी संपूर्ण देशाची स्थिती होण्याआधी केंद्र आणि सर्व राज्य सरकारांनी देशभरात ‘बांगलादेशी घुसखोर शोध मोहिम’ राबवून सर्व बांगलादेशी घुसखोरांना शोधून काढावे, त्यांच्यावर कठोर कारवाई करावी आणि त्यांना देशाबाहेर हाकलावे, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीचे प्रवक्ता श्री. सतीश कोचरेकर यांनी केली आहे. ते मुंबई मराठी पत्रकार संघ येथे ३ फेब्रुवारी या दिवशी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. या दृष्टिने जनजागृतीसाठी संपूर्ण देशभरात आंदोलने, मोर्चे, स्वाक्षरी अभियान, पोलिस तक्रारी दाखल करणे असे नियोजन सुद्धा आम्ही करणार आहोत, हे श्री. कोचरेकर पुढे म्हणाले. यावेळी सनातन संस्थेचे प्रवक्ता श्री. अभय वर्तक, मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता राहुल पाटकर हे सुद्धा उपस्थित होते.

सनातन संस्थेचे प्रवक्ता श्री. अभय वर्तक म्हणाले, 'देशभरात अनेक शहरी भागांमध्येही शेकडो बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांना अटक झाली. मुंबई आणि नवी मुंबई मध्ये ८ ते १० लाखाहून अधिक बेकायदेशीर घुसखोर राहत असल्याचा अंदाज आहे. अशीच स्थिती देशभरात आहे. खरेतर ही आकडेवारी म्हणजे हिमनगाचे टोक आहे. बांगलादेशी घुसखोर ही समस्या देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर असून याची पाळेमुळे खणून काढणे अत्यावश्यक आहे. देशभरात ‘बांगलादेशी घुसखोर शोध मोहिम’ राबवावी; या अंतर्गत देशातील सर्वच जिल्हे, शहरे, तालुके येथील संशयित ठिकाणी ‘सर्च ऑपरेशन’/‘कोंम्बींग ऑपरेशन’ राबवून बांगलादेशी घुसखोरांना शोधून काढावे; बनावट ओळखपत्रे तयार करणार्या रॅकेटची पाळेमुळे उखडून त्यावर कठोर कारवाई करावी; भाड्याने खोली देण्याआधी घरमालकाने भाडेकरूंची, तसेच कामावर ठेवतांना कामगारांची योग्य ती चौकशी करावी, संशयास्पद आढळल्यास तत्काळ पोलिसांना कळवावे; घुसखोरांना आश्रय देणारे, जामीन देणारे किंवा कोणत्याही प्रकारचे साहाय्य करणारे यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, अशी आमची मागणी आहे. देशातील अनेक समस्यांच्या मुळाशी बांगलादेशी घुसखोर आहेत. या दृष्टीने 'बांगलादेशी घुसखोर हाकला, देश वाचवा' ही मोहीम आम्ही सर्व हिंदू संघटना मिळून देशभर राबवणार आहोत. याला जनतेनीही साथ द्यावी असे आम्ही आवाहन करत आहोत. आम्ही देश घुसखोरमुक्त करून दाखवू.'

मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता राहुल पाटकर म्हणाले, 'बांगलादेशी घुसखोर देशातील रोजगार हिसकावून घेत आहे. महाराष्ट्रातील संभाजीनगरमधील सिल्लोडमध्ये एक लाखाहून अधिक बांगलादेशी घुसखोरांना बोगस प्रमाणपत्र वाटप करण्यात आल्याचा अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रत्नागिरीतील चिपळूण १३ बांगलादेशी नागरिकांपैकी ३ जणांनाच अटक करण्यात आली; त्यातही पोलिसांनी हे प्रकरण नीट न हाताळल्यामुळे बांगलादेशी घुसखोरांना जामीन मिळाला, ही अतिशय गंभीर बाब आहे. देशाची न्यायव्यवस्था बांगलादेशी घुसखोरांना जामीन देते, ही न्यायदेवतेची थट्टा आहे. 'सध्या बांगलादेशात अल्पसंख्यांक हिंदूंवर अनन्वित अत्याचार होत आहेत. उद्या हेच बांगलादेशी घुसखोर वाढत जाऊन भारतात छोटे बांगलादेश निर्माण करून तेथील हिंदूंवर असेच अत्याचार करतील, ही परिस्थिती येऊ द्यायची नसेल, तर या प्रकरणी सरकारने आताच कठोर पावले उचलायला हवीत', असे हिंदु जनजागृती समितीचे प्रवक्ता श्री. कोचरेकर शेवटी म्हणाले.

पान १ वरुन

## नसता राज्य दखल ...

पाईप लाईन आणि असलेली झाडे याची योग्य दखल न घेता त्याचाही योग्य मोबदला मिळत नसल्याने संतप्त २०० शेतकऱ्यांनी दि. २२ जानेवारी रोजी प्रशासनाला निवेदन देवून दि. ५ फेब्रुवारी रोजी आत्मदहन करण्याचा ईशारा दिला होता. तत्पुर्वी गत ७ दिवसांपासून देवमुर्ती येथे दिलीप राठी यांच्या नेतृत्वात धरणे आंदोलन सुरु करण्यात आले होते. मात्र, या आंदोलनाची प्रशासनाकडून दखल घेतली जात नसल्याने शेतकऱ्यांच्या भावना अत्यंत संतप्त बनल्या होत्या. त्यामुळे माय-माऊल्यांसह गाडी-बैलांच्या साक्षीने हे आंदोलन अधिकच तीव्र बनविण्यात आले होते. मात्र, आज सोमवारी (ता. ३) सकाळी प्रथम आ. अर्जुनराव खोतकर यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेवुन दिलीप राठी यांच्यासह शेतकऱ्यांनी टोकाची भुमिका घेवु नये, अशी विनंती आ. खोतकर यांनी केली होती. मात्र, शासनाकडून संपादीत जमिनीबाबत ठोस आश्वासन मिळत नाही तोपर्यंत आंदोलन सुरुच ठेवण्याची भुमिका शेतकऱ्यांसह श्री. राठी यांनी घेतली होती. त्यामुळे दुपारपर्यंत हे आंदोलन अधिक तीव्र बनणार अशी शक्यता बळावली होती. मात्र, सायंकाळी आ. खोतकर यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी देवमुर्ती येथे येत आंदोलनकर्त्यांची भेट घेवुन जमिन संपादनाच्या प्रक्रीयेत राहिलेल्या त्रुटी दुर करण्याबाबत प्रशासन सकारात्मक असल्याची ग्वाही दिली. त्यासोबतच शेतकऱ्यांनी प्रशासनासोबत चर्चा करण्यासाठी एक समिती नेमुन वेळोवेळी चर्चा करुन आपण शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मार्ग काढूत, असे सांगितल्याने सायंकाळी आंदोलनाचे प्रमुख दिलीप राठी यांनी आंदोलन महिनाभरासाठी स्थागित करीत असल्याचे जाहीर केले.

दरम्यान, यावेळी बोलतांना आ. खोतकर यांनी शासन-प्रशासनाची बाजु मांडून आपण कायम शेतकऱ्यांसोबत असल्याचे सांगुन जमिन संपादनाच्या विषयातील त्रुटी आपण जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांसह मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या कानावर टाकल्याची माहिती दिली. तसेच त्यांनी येत्या ५ कवा ६ फेब्रुवारी रोजी मंत्रालयात बैठक लावण्याचे अश्वासन दिले असून, या बैठकीसह इतर प्रत्येकवेळी पाठपुरावा करुन शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करुत, अशी ग्वाही दिली. शेतकरी हा जमिनीच्या माध्यमातुन काळजाचा तुकडा देवून शासनाच्या प्रकल्पाला मदत करीत असून, त्यांच्या वडीलोपार्जीत जमिन शासन संपादीत करीत आहे. त्यामुळे या जमिनीचा मोबदला देतांना प्रशासनाने सकारात्मक भुमिका घेण्याची आणि त्यासोबतच दिलीप राठी यांच्यासह शेतकऱ्यांनी शासन-प्रशासनाला थोडा वेळ देण्याची अपेक्षा आ. खोतकर यांनी व्यक्त केली. तोच धागा पकडून जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनीही पुरक विकास असण्याची भुमिका मांडत शेतकऱ्यांच्या जमिनीच्या मुल्यांकनासह झाडाच्या कमती काढण्यात झालेल्या त्रुटी दुर करणे आणि त्यासोबतच विविध शेतातील विहीरी, पाईप लाईन, गोठे यांची नोंद घेण्याबाबत झालेल्या चुकांची दुरुस्ती केली जाईल, असे जाहीर केले. मात्र, त्यासाठी शेतकऱ्यांनी आंदोलनाची भुमिका सोडून चर्चेच्या भुमिकेत येणे आवश्यक असून, या चुकांच्या दुरुस्तीसाठी कालमर्यादा निश्चित करावी आणि शेतकऱ्यांची समिती गठीत करुन वेळोवेळी त्या समितीसोबत चर्चा करुन दुरुस्तीचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला जाईल, अशी हमी दिली. त्यावर आजच्या परिस्थितीत आपले समाधान होत असलेतरी येणाऱ्या काळात प्रशासनाने दिलेल्या शब्दावर कायम राहावे, अन्यथा येणाऱ्या काळात असे आंदोलन उभा करेल की राज्य दखल घेईल, असा ईशारा देत श्री. राठी यांनी तुर्तास आंदोलन स्थगित करीत असल्याचे जाहीर केले. त्याचे सर्वांनी स्थागत केले. यावेळी अपर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, तहसिलदार श्रीमती छाया पवार, शिवसेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख पंडीतराव भुतेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, पोलीस निरिक्षक सुरेश उनवणे यांच्यासह प्रशासकीय व्यवस्थेतील अधिकाऱ्यांची आणि आंदोलक शेतकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## कमी रेशन ...

देत असेल तर त्याची जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयात तक्रार करावी, संबंधित दुकानदाराविरोधात कारवाई केली जाईल असा इशारा देखील जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाचे निरीक्षक अधिकारी प्रकाश जाधव यांनी सोमवार ( दि ३) रोजी दिला आहे.

# तीस टन राशनचे तांदूळ व ट्रक परतूर पोलिसांनी केला जप्त



**परतूर । प्रतिनिधी -** माजलगाव येथून नागपूर येथे राशनचा तांदूळ काळा बाजारात जात असल्याची दि.०२/०२/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता गोपनीय माहिती माहिती पोलिस निरीक्षक एम. टी. सुरवसे यांना मिळाली त्यावरून वाटूर फाटा येथे नाकाबंदी करून ट्रक क्रमांक एम.एच.२३ ए.यू .९३९३ हा पकडून पाहणी केली असता त्या मध्ये तांदूळ मिळून आल्याने नायब तहसीलदार पुरवठा विभाग परतूर दादमिया शेख परतूर यांना समक्ष घटनास्थळी पाहणी करून अहवाल सादर केला आहे, सदर ट्रक मध्ये ३० टन राशनचे तांदूळ किंमत १०,५०,०००/- आणि ट्रक किंमत ३० लाख असा एकूण- ४०,५०,०००/- चा मुद्देमाल मिळून आल्याने गुन्हा नोंद करून कारवाई करण्यात आली आहे, ट्रक चालक, राजेंद्र बळीराम पोटेकर रा. सिपगाव ता. गेवराई आणि क्लिनर , अमोल रावसाहेब उबाळे रा. वरखेड ता. शेवगाव तसेच ट्रक मालक आणि राशन तांदूळ चे मालक असे ४ आरोपी च्या विरुद्धात गुन्हा नोंद करून कारवाई केली आहे, सदरचा मुद्देमाल हा परतूर येथील शासकीय गोडाऊन मध्ये जमा केला आहे. सदरची कारवाई ही अजय कुमार बंसल, पोलिस अधीक्षक जालना, आयुष नोपाणी, अप्पर पोलिस अधीक्षक जालना, दादहरी चौरे, उप विभागीय पोलिस अधिकारी, परतूर यांच्या मार्गदर्शनाखाली एम.टी.सुरवसे पोलिस निरीक्षक, पोलिस स्टेशन परतूर, दादामिया शेख, नायब तहसिलदार परतूर, विठ्ठल केंद्रे, पो.उप.निरिक्षक राऊते पो. उप. निरीक्षक सफौ/ नंदू खंदारे, पोह/ किरण चव्हाण, पोका/ नरेंद्र चव्हाण, भगवान खालापूरे ऑपरेटर, चालक पोह/ धोत्रे यांनी केली आहे.

### सतीश घाटगे यांनी पूर्ण केला शहागडच्या जनतेला दिलेला शब्द

# बस स्थानक परिसरात उभारले सुसज्ज स्वच्छतागृह

**अंबड । प्रतिनिधी -** तालुक्यातील शहागड येथील बस स्थानकात स्वच्छतागृहाची व्यवस्था नव्हती. स्वच्छतागृहाअभावी महिला प्रवाशासंह स्थानिक नागरिकांची कुचुंबना होत होती. हा प्रश्न सोडविण्याचा शब्द समृद्धी शुगर्सचे चेअरमन सतीश घाटगे यांनी दिला होता. त्यानुसार या ठिकाणी १० लक्ष रुपयांचा निधी मिळवून देत सुसज्ज अशा स्वच्छतागृहाची निर्मिती त्यांनी केली. प्रवाशांसह येथील व्यापाऱ्यांचा महत्वाचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल शहागडच्या जनतेने सतीश घाटगे यांचे आभार मानले.

गेल्या अनेक वर्षापासून शहागड बस स्थानकातील स्वच्छतागृहाचा प्रश्न चर्चेत होता. परंतु कुणीही हा प्रश्न मार्गी लावू शकले नव्हते. सहा महिन्यापूर्वी शहागड येथील नागरिकांनी व व्यापाऱ्यांनी सतीश घाटगे पाटील यांच्याकडे हा प्रश्न मांडला होता. सतीश घाटगे यांनी हा प्रश्न संवेदनशील पणे समजून घेऊन शहागड बस स्थानक परिसरात सुसज्ज स्वच्छतागृह उभारण्यासाठी १० लाखाचा निधी शासनाकडून मंजूर करून आणला. या निधीतून बस स्थानक परिसरात सुसज्ज असे स्वच्छतागृह तयार झाले. २ फेब्रुवारी रोजी सतीश घाटगे यांच्या हस्ते या स्वच्छतागृहाची लोकार्पण झाल्यानंतर नागरिकांसाठी हे स्वच्छतागृह खुले करण्यात आले.

### सत्ता असो वा नसो जनतेचे प्रश्न सोडवता येते- सतीश घाटगे

जनतेचे प्रश्न खूप मोठे नाहीत, फक्त ते सोडविण्यासाठी इच्छाशक्तीची गरज असते. निवडणुकीत पराभव झाला असला तरी माझे राजकारण विकासावर होते आणि यापुढेही राहील. जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी सत्ता असो किंवा नसो प्रश्न सोडवता येतात. माता - भगिनींची स्वच्छतागृहाअभावी होणारी कुचंबना थांबवता आली याचे समाधान आहे. हे काम करून मी शहागडच्या जनतेला दिलेला शब्द पूर्ण केला आहे.




## बालविवाह रोखणे शक्य - प्रा. डॉ.दिपक बुक्तरे

**जालना -** अजितदादा पवार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय रामनगर च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष सातदिवसीय श्रमसंस्कार शिबिर मौजे मानेगाव (ज) येथे सुरू आहे या शिबिरातील उद्बोधन सत्रामध्ये प्रमुख वक्ते म्हणून बोलताना प्रा.डॉ.दीपक बुक्तरे सर म्हणाले की स्त्री शिक्षण आणि जनजागृतीतून बालविवाह रोखला जाऊ शकतो ,शिक्षित युवा पिढीने झोकून देऊन या कामी आपले योगदान द्यावे असे आव्हान त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ.सुनील नजान हे होते त्यांनी भविष्यातील युवा पिढी समोरील समस्यांवर प्रकाश टाकला यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. कमलाकर रगडे प्रा. दिलीप देव्हडे,श्री संजय चव्हाण, श्री सचिन भुतेकर, यांच्यासह विद्यार्थी स्वयंसेवक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते सदरहून कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. ज्योती नन्नवरे हिने तर आभार कु. प्रियंका खाटीक मोर हिने व्यक्त केले.

# माता रमाई जयंती मिरवणूक शांततेत पार पाडावी - मच्छिन्द्र सुरवसे

### परतूर पोलीस ठाण्यात शांतता कमिटीची बैठक



**परतूर । प्रतिनिधी -** माता रमाई जयंती आनंदात आणि उत्साहात साजरी करावी मात्र मिरवणूक शांततेत पार पाडावी असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक मच्छिन्द्र सुरवसे यांनी केले. माता रमाई जयंतीनिमित्त पोलीस ठाण्यात आयोजित शांतता कमिटीच्या बैठकीत ते बोलत होते.आंबेडकरी चळवळीतील नेते,सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार अर्जुन पाडेवार यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

सुरवसे पुढे बोलताना म्हणाले की, माता रमाई आंबेडकर यांची जयंती आनंदात आणि उत्साहाच्या वातावरणात साजरी करावी.मिरवणूकीत पोलीस बंदोबस्त असणार आहेच,मात्र नागरिकांनी मिरवणूक शांततेत पार पडण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे. मिरवणुकीदरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडणार नाही यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत.मात्र मिरवणुकीत गैरप्रकार करून कायदा व सुव्यवस्थेला गालबोट लागेल असे कृत्य कोणीही करू नये असे आवाहन करतानाच मिरवणुकीतील गैरप्रकार खपवून घेणार नाही असेही सुरवसे म्हणाले.

यावेळी अर्जुन पाडेवार म्हणाले की,माता रमाई यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी माता रमाई यांच्या प्रतिमेची मिरवणुक काढण्यात येणार आहे.७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता शहरातील रेल्वे स्टेशनजवळील संविधान चौकातून मिरवणुकीला प्रारंभ होणार असून ही मिरवणूक शहरातील मुख्य रस्त्याने महादेव मंदिर चौक, शिवाजीनगर, तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन चौक,मंलगशा चौक , भाजीमंडई मार्गे आंबेडकरनगर येथे सामुदायिक बौद्ध वंदना घेऊन समारोप करण्यात येणार आहे. मिरवणूक मार्गावरील रोडवर पडलेले बांधकाम मटेरीयल उचलण्यात यावे, साफसफाई करण्यात यावी तसेच मिरवणूक मार्गावर ज्या ठिकाणी ज्या विद्युततारा तारा लोंबकळलेल्या असतील त्या काढून घ्याव्यात किंवा आणखी उंचीवर घ्याव्यात जेणेकरून मिरवणुकीला अडथळा निर्माण होणार नाही असेही पाडेवार म्हणाले.

यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रशांत वाकळे, सचिव स्वप्निल पहाडे, यांच्यासह अनेक अनेकांची उपस्थिती होती.

# माजी केंद्रीय राज्यमंत्री दानवे यांच्या नेतृत्तात पाहेगाव उपसरपंच सुरेश चव्हाण, राजू तळेकर यांचा भाजपात प्रवेश

**जालना । प्रतिनिधी -** माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन जालना तालुक्यातील मौजे पाहेगाव येथील उपसरपंच सुरेश चव्हाण व ग्रामपंचायत सदस्य तथा माजी उपसरपंच राजू तळेकर यांनी काँग्रेस मधून भाजप मध्ये जाहीर प्रवेश केला.

यावेळी रावसाहेब दानवे यांनी सांगितले की, भाजपामध्ये आपले हार्दिक स्वागत येणाऱ्या काळात प्रामाणिकपणे जनतेची सेवा करा, पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी सर्वसामान्य जनतेसाठी अनेक जनकल्याणकारी योजना मंजूर केल्या आहेत या योजनांचा लाभ सर्वसामान्य जनतेला करून देऊन आपल्या गावात एकही लाभार्थी लाभापासूनवंचित राहणार नाही याची काळजी घ्यावी व पक्षवाढीसाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करावे असे हि सांगितले. यावेळी जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे, जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, तालुकाध्यक्ष वसंत शिंदे, मुकेश चव्हाण, संजय डोंगरे, निवृत्ती लंके, राजभाऊ कळकुंबे, दत्ता जाधव, संतोष राठोड आदींची उपस्थिती होती



# सामाजिक न्याय विभागाने दलितांची थट्टा थांबवावी!

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागअंतर्गत १९८८पर्यंत डॉक्टर. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार दिले जायचे. त्यानंतर त्या पुरस्कारचे नाव बदलून डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार असे ठेवले गेले.

दरवर्षी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जाती व इतर मागासवर्गीय यांच्यासाठी तसेच शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या अपंग, पीडित व दुर्लक्षित गरजूची निष्ठेने सेवा करणाऱ्या तसेच सामाजिक क्षेत्रात मौलीक काम करणाऱ्या सेवाभावी संस्था आणि व्यक्तींना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण देऊन गौरविन्यात येते. महाराष्ट्र शासनाचे सामाजिक न्याय विभाग असे दरवर्षी ५१पुरस्काराचे वाटप करते.या पुरस्काराला समाजात मोठा मान आहे. या मिळालेल्या पुरस्काराने त्या व्यक्तीला आणि संस्थेला समाजासाठी अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळते.

गेल्या वर्षी एकत्रित पाच वर्षाचे पुरस्कार वाटले गेले आणि तिथे गोंधळ निर्माण झाला. यावर्षी सुद्धा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने विविध वृत्तपत्रात विविध पुरस्काराकरिता अर्ज मागविले आहेत.यात संत रविदास पुरस्कार, पद्मश्री कर्मवीर दादा साहेब गायकवाड पुरस्कार, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुरस्कार आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार असे पुरस्कारांची नावे असून पुरस्कार स्वरूप म्हूणन मानपत्र आणि पंधरा हजार, एकवीस हजार आणि पंचवीस हजार अशी तुटपुंजी रक्कम दलित पुरस्कार्थी यांना देण्यात येणार आहे.ही दलित समाजाची एकप्रकारे थट्टाच सरकार कडून करण्यात येत आहे.

सुरवातीला दलितमित्र प्राप्त व्यक्तीला एक हजार रुपये दिले जात. ३६वर्षात या पुरस्काराच्या रक्कमेत १४ हजाराची वाढ केली. ३६ वर्षानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कारासाठी १५ हजार रोख रक्कम दिली जात आहे ही दलित समाजाची घोर थट्टा आहे. तर दुसरीकडे कडे १९९६ मध्ये कला, क्रीडा आरोग्यसेवा, उद्योग, पत्रकारिता, विज्ञान, समाजसेवा क्षेत्रात कामागिरी बजावणाऱ्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्यास सुरुवात केली तेव्हा त्याची रक्कम एक लाख रुपये होती. आता यांच महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्राप्त व्यक्तीना २५ लाख रुपये रोख दिले जातात.हा भेदभाव कशासाठी. महाराष्ट्र भूषण हा सर्वोच्च पुरस्कार असला तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार हा सुद्धा त्याच्या तोडीस तोड आहे. दलित समाजाची अनेक वर्ष सेवा करुन सरकार जर पुरस्कार देताना दलित समाजाचा अपमान करीत असेल तर ह्या पुरस्काराला काहीच किंमत राहत नाही. दलित समाजाची सेवा करीत असताना त्या पुरस्कारप्राप्त व्यक्तीने त्याच्या पोटाला चिमटा देऊन दलित समाजाची सेवा केली. त्यांनी आपल्या घरादारावर तुळशीपत्र ठेऊन वन वन भटकून समाज प्रबोधनाचे कार्य केले आणि त्यांनाच पुरस्कार देताना सरकार हात आकडते घेत असेल तर हा दलित समाजाचा आणि दलित समाजासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तीचा घोर अपमान आहे.



मायबाप सरकारने याची योग्य दखल घेऊन दलित समाजाला देण्यात येणाऱ्या पुरस्काराच्या रक्कमेत वाढ करावी आणि त्यांची थट्टा थांबवावी.

**दत्ता श्रावण खंदारे धारावी**
**मोबाईल नं. ९६९९३१३६२१**

# माझ्या नादेला लागला ना...

### गोरंटयाल यांची खोतकरांना धमकी

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात आमदार अर्जुन खोतकर आणि माजी आमदार कैलास गोरंटयाल यांच्यात मतभेद सर्वश्रुत आहेत. आता पुन्हा एकदा यांच्यातील वाद भडकण्याची शक्यता आहे. आमदार अर्जुन खोतकर यांनी संगीता गोरंटयाल नगराध्यक्ष असतानांच जालना महापालिकेच्या टॅक्समध्ये वाढ झाल्याचा आरोप करत भ्रष्टाचार झाला असून हा भ्रष्ट्राचार बाहेर काढणार असल्याचा ईशारा दिल्यांनतर माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी रविवार (दि २) रोजी सायंकाळी प्रतिक्रिया देत आमदार अर्जुन खोतकर यांना ईशारा दिला आहे. तत्कालीन जालना नगरपरिषदेने वाढवलेल्या टॅक्स बाबत तत्कालीन मंत्री अर्जुन खोतकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात बैठक घेतली आणि वाढवलेला टॅक्स राज्य सरकारकडून कमी करून आणण्याची ग्वाही दिली. पण खोतकरांनी याचं काही केलं नाही. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असतांना खोतकरांनी त्यांच्या भाच्याच्या नावाने जालना नगर परिषदेची चौकशी लावली होती. त्यात ३ उपजिल्हाधिकारी होते त्या चौकशी समितीनं आम्हाला क्लीन चिट दिली होती. जालना महानगरपालिकेला अकाउंट कोड आलेला आहे त्यामुळे सगळी जबाबदारी ही मुख्याधिकारी यांची असते नगराध्यक्षची नाही. त्यामुळे जबाबदार मुख्याधिकारी असतात. या कोडमुळे नगराध्यक्षावर भ्रष्टाचाराचे आरोप करता येत नाही. मी पहिल्यांदा आमदार झालो होतो तेव्हा याच्या दर्शना हॉटेलचे प्रकरण बाहेर काढले होते. याच अर्ध कुटुंब जेलमध्ये जाणार होत पण हा हात जोडून उभा राहिल्याने मी सोडले. तू



बारूदवर बसलेला आहे. मी काडी लावली ना.? तू कुठे राहशील? माझे नाव कैलास गोरंटयाल आहे सोडणार नाही. तुला माझ्या नादेला लागला ना बेटा तुझे काय हाल करीन लक्षात ठेव अशी धमकीच गोरंटयाल यांनी खोतकरांना दिली असल्याने गोरंट्याल - खोतकर यांच्यातील वाद भडकण्याची चिन्हे निर्माण झाली आहे.

# चारचाकी - दूचाकीच्या अपघातमध्ये दोन जखमी


**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** टेंभुर्णी कडे येणाऱ्या दोन चाकी आणि टेंभुर्णी हून जालना जाणाऱ्या चार चाकी वाहनाच्या जबरदस्त अपघात मध्ये दोन जन जखमी मध्ये एकांची तबीयत जास्त असल्याची माहिती आहे. टेंभुर्णी जालना रोड वर अकोला देव फाट्यावर मोठा अपघात होऊन मोटार सायकल क्रमांक चक २८ छ ७६२८ ही गाडी जागीच चुरा झाली असून,चक२१ इट-०४७० ही किया गाडी रोड खाली गेल्याची घटना ठीक सवाचारच्या दरम्यान घडली.या घटनेत योगा योग दोन्ही शिक्षक असल्याने परिसरातील शिक्षक मंडळी या घटने मुळे चिंता ग्रस्त झाले होते. यातील मोटार सायकल वर आलेले डावरगाव येथे कार्यरत असलेले शिक्षक महेश गोपाल अहिरे हे जास्त गंभीर असून त्यांच्या दोन्ही पायाला




जास्त दुखापत झाल्याची माहिती पोलिस अधिकारी यांच्या वतीने देण्यात आली.चार चाकी मध्ये असलेले प्रा निवर्ती बनसोड हे ही जख्मी आसल्याची माहिती असून पुढील तपास स पो उप निरीक्षक रवी देशमाने आणि ए आर घोंगे करत आहे. या अपघात मध्ये दोन्ही गाडी चे मोठे नुकसान झाले आहे.

# श्री रेणुका देवी मंदिरात तीन दिवसीय प्राणप्रतिष्ठा आणि कलशारोहण सोहळा

## तीन दिवस भरगच्च धार्मिक कार्यक्रमाची रेलचेल



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील रामनगर भागातील गांधीनगर येथील श्री रेणुका देवी मंदिर संस्थानच्यावतीने ५ ते ७ फेब्रुवारीदरम्यान भव्य प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी भव्य शोभायात्रेने या सोहळ्याला सुरुवात होत असून, तीन दिवस विविध धार्मिक विधी, पूजापाठ, कीर्तन, प्रवचन आदी भरगच्च कार्यक्रमाची रेलचेल राहणार आहे.

बुधवार दि. ५ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता मंदिर परिसरातून भव्य शोभायात्रा निघणार आहे. गांधीनगर, घनतृप मारुती मंदिर, सुवर्णकारनगर, तुळजाभवानी मंदिर ते श्री रेणुका देवी मंदिर असा शोभायात्रेचा मार्ग आहे. त्यानंतर सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत प्राणप्रतिष्ठेचा मुख्य पूजाविधी संपन्न होईल. दुपारी १.३० वाजता महाप्रसाद, सायंकाळी ६ वाजता हरिपाठ, रात्री ८ वाजता प्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. श्री विष्णू महाराज बारड यांचे हरिकिर्तन, गुरुवारी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत महापूजा, अभिषेक, होम-हवन आणि अन्य पारंपरिक विधी होतील. रात्री ८ ते १२ या वेळेत ह. भ. प. देविदास धोंगडे, ह. भ. प. बाबासाहेब बेंद्रे आणि ह. भ. प. पृथ्वीराज देवानंद माळी हे गोंधळ कथा सादर करणार आहेत. शुक्रवार दि. ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते १ वाजेपर्यंत प्राणप्रतिष्ठा पूर्णाहूती, महाअभिषेक, ११ वाजता प. पू. गुरुवर्य भगवान बाबा आनंदगडकर यांच्याहस्ते कलशारोहण होणार आहे. १.३० वाजता महाआरती आणि त्यानंतर सायंकाळी ६ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री ८ वाजता पुणे येथील ह. भ. प. काका महाराज खैरे यांच्या हरिकीर्तनाने प्राणप्रतिष्ठा आणि कलशारोहण सोहळ्याची सांगता होणार आहे.

भाविकांनी मोठ्या संख्येने धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आकाश पवार, विशाल पवार, विशाल उगले, अर्जुन कवडे, अक्षय धुमाळ, सुनील पवार, रोहित उगले, विठ्ठल काटे, कचरू सांबरे, दत्ता ठोंबरे, कृष्णा उगले, कृष्णा पवार, जयेंद्र बन्सीले, हरिभाऊ नाटकर, शक्तीसिंह राजपूत, रामकिशन उगले, गणेश पवार, अनिल उगले, प्रेमचंद्र मखानी, ऋषी उगले, लक्ष्मण धुमाळ, सुनील सूर्यवंशी, गणेश जल्लेवार, दत्ता कुरंगळ, रमेश सूर्यवंशी, सुभाष पवार, विठ्ठल काटे, महेश दुसाने, पंडितआप्पा नामदे, सिताराम धुमाळ, राम शुक्ला, गोविंद चित्राल, छगन देवरे, अभिमन्यू जाधव, श्रीमती ज्योती उगले, दगडू पवार, प्रसन्न जाफराबादकर, सोमनाथ कवडे, उद्धव केंधळे, सुखदेव सराफ, विनोद भगत, पांडुरंग उगले, गौतम गेही, हरेश देवावाले, शाहीर आप्पासाहेब उगले, डॉ. बाबुराव लोखंडे, गंगाधर पवार, नंदू सूर्यवंशी, डॉ. विठ्ठल पवार, काशिनाथ इंगळे, विलास पवार, महेश भालेराव, लखन कनिसे, माणिकराव मराठे, विनायकराव भागिले, अमृत पवार, विजय इंगळे यांच्यासह श्री रेणुका देवी मंदिर संस्थांच्यावतीने करण्यात आले आहे.

---

जालना शहर महानगरपालिका व पतंजली योग शिबीर समिती यांच्या संयुक्त उपक्रम

# योग प्राणायाम शिबीरास प्रारंभ

शुक्रवारपर्यंत राहणार शिबीर; मनपा आयुक्त संतोष खांडेकर, प्रल्हाद हरबक, राजेश राऊत, संध्या देठे यांची प्रमुख उपस्थिती






**जालना । प्रतिनिधी -** शहर महानगरपालिका व पतंजली योग शिबीर समिती यांच्या संयुक्त विद्यमाने योग प्राणायाम शिबीराचे आयोजन दिनांक ०३.०२.२०२५ ते दिनांक ०७.०२.२०२५ पर्यंत रोजी सकाळी ०६.०० ते ७.३० या वेळेत स्व. कल्याणराव घोगरे स्टेडियम या ठिकाणी केले जाणार आहे.

सदरील शिबीरास आज दिनांक ०३.०२.२०२५ पासुन प्रारंभ सुरुवात झाली. यावेळी जालना मनपाचे आयुक्त तथा प्रशासक श्री. संतोष खांडेकर यांनी दिपप्रज्वलन केले. सदर शिबीरामध्ये पतंजली योग समितीसह राज्य प्रभारी योग शिक्षक प्रल्हाद माऊली हरबक, माजी उपाध्यक्ष श्री. राजेश राउत, माजी नगरसेविका श्रीमती संध्या संजय देठे, अतिरिक्त आयुक्त श्रीमती प्रीयंका राजपुत, उपायुक्त नंदा गायकवाड, सहायक आयुक्त सुप्रीया चव्हाण, सहायक आयुक्त अपर्णा जाधव, कार्यालयीन अधिक्षक श्री. विजय फुलंब्रीकर, मालमत्ता विभाग प्रमुख श्री. राहुल देशमुख, स्वच्छता विभाग प्रमुख श्री. पंडीत पवार, अभियंता श्री. अशोक कटारे, लिपीक श्री. संजय भालेराव, श्री. मोहन जामदार, बंडु चव्हाण, अजय पेंबार्ती तसेच मनपातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी सदर शिबीरास पोलीस प्रशिक्षण केंद्र कार्यालय, जालनाचे प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

तरी जालना शहर महानगरपालिकातर्फे शहरातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, सदरील योग शिबीर उपस्थित राहुन शिबीराची शोभा वाढवावी.

---

## मनपा निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादीची घाटकोपर पश्चिमच्यावतीने आढावा बैठक



**घाटकोपर । प्रतिनिधी -** मुंबई महानगरपालिकेच्या येणाऱ्या निवडणुकीसंदर्भात आढावा घेण्यासाठी व पूर्व तयारीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार) घाटकोपर पश्चिम तालुक्यातील बेसिक, महिला,विद्यार्थी, सेवादल, असंघटित कामगार विभाग व सर्व फ्रंटलच्या पदाधिकाऱ्यांची व कार्यकर्त्यांची सभा बुधवार दि.०५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५:३० वाजता मार्केट इमारत,विर माता जिजाऊ मनोरंजन गार्डन समोर,एन.एस.एस रोड घाटकोपर पश्चिम मुंबई याठिकाणी आयोजित करण्यात आली आहे.तरी या सदर सभेस शिवाजीराव नलावडे (कार्याध्यक्ष मुंबई विभागीय राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी) व सुरेश भालेराव (घाटकोपर जिल्हाध्यक्ष), श्रीमती शालिनीताई गायकवाड (निरिक्षक-घाटकोपर (पश्चिम) तालुका इत्यादी मान्यवरांची उपस्थिती व मार्गदर्शन लाभणार असून या आढावा बैठकीला सर्व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सर्व महिला, पुरुष कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन घाटकोपर पश्चिम तालुका अध्यक्ष हिराचंद्र चंद्रकांत सुर्यवंशी यांनी केले आहे.

---

## तरूणांनी दुरदृष्टी व सकारात्मक विचार करून उद्योग उभारावेत - के. डी. दांडगे



**जालना । प्रतिनिधी -** मिटकॉन प्रशिक्षण केंद्र जालना यांच्या वतीने जालना येथे आज दि. ०३ फेब्रुवारी २०२५ रोजी एक दिवशीय उद्योजकता विकास कार्यशाळा घेण्यात आली.यावेळी के डी दांडगे, जिल्हा प्रकल्प अधिकारी, मिटकॉन, जालना, प्रल्हाद किसनराव चिंचाने माजी चेअरमन गोदावरी सहकारी साखर कारखाना देवनांद्रा, देवनाथ जाधव माजी सभापती घनसावंगी , उद्योजक संतोष रासवे जालना यांचें मार्गदर्शन लाभले. या वेळी विजय विरकर ,केशव थोरे, अमोल बोराटे, रामेश्वर सत्वधर,विष्णु गिराम,चंद्रभान गिराम, रामेश्वर गाडेकर, जगन्नाथ शिंदे व काकासाहेब पवार या प्रशिक्षणार्थींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शन करताना श्री दांडगे म्हणाले की तरूणांनी दुरदृष्टी व सकारात्मक विचार करून उद्योग उभारले पाहिजे त्यासाठी गरज आहे योग्य मार्गदर्शनाची त्यासाठी या प्रशिक्षणात बारकावे समजून सांगितले.या प्रशिक्षणात सौर ऊर्जा , विद्युत वाहणे,सायबर सुरक्षा,बंदीस्त शेळीपालन,कुकूटपालन,दुग्ध व्यवसाय, जैविक खते, रेशीम उद्योग, दालमिल,विटा तयार करणे, मसाला उद्योग,गृह उद्योग, कांडी कोळसा,शेती पूरक व्यवसाय या सोबत उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा,व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योगांच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, राष्ट्रीय पशुधन विकास योजना,प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था,भांडवल उभारणी ,मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने या विषयी मार्गदर्शन करण्यात आले आहे.अधिक माहिती व मार्गदर्शनासाठी के डी दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी मिटकॉन द्वारा पत्रकार भवन , एस पी ऑफीस समोर जालना मो.९४२३७३०९३२ येथे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.